# प्रेस नोट

दिनांक ०२/०३/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | १०/२०२२ |
| ३ | कलम | कलम ७ भ.प्र.अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | लोकसेवक सौ. प्रज्ञा प्रमोद भोसले, वय ३८ वर्षे, वर्ग–३, वरिष्ठ लिपीक, उप अभियंता वांद्रे (सा.बां.) उप विभाग, क्र. १ यांचे कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई– ४०००५१ |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | **रु. १०,०००/–** |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | **रु. १०,०००/–** |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | **रु. १०,०००/–** |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी हे मागील १५ वर्षापासुन बांद्रा येथील शासकीय निवासस्थानात राहावयास आहेत त्यांनी शासकीय निवासस्थान बदलुन मिळण्याकरिता लोकसेवक काम करित असलेल्या कार्यालयात दि. २५/१०/२०२१ रोजी विनंती अर्ज सादर केला होता. सदर अर्जावर लोकसेवक या कार्यवाही करत होत्या. फिर्यादी यांनी आलोसे यांचेकडे निवासस्थान बदलुन मिळावे म्हणुन पाठपुरावा केला असता आलोसे यांनी निवासस्थान बदलुन देण्याकरिता लागणारे शिफारसपत्र सार्वजनिक बांधकाम विभाग अंधेरी, मुंबई यांच्या कार्यालयास पाठविण्याकरिता फिर्यादी यांचेकडे रु. १०,०००/– लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि. १८/०२/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार अर्ज दिला.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दि. २१/०२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे तडजोडी अंती रू. १०,०००/– इतक्या रकमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले.<br><br>आज दि. ०२/०३/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केलेल्या रू. १०,०००/– इतकी लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

( शिवराज ज. म्हेत्रे )
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

**संपर्क**:–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट – acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,फेसबुक: www.facebook.com Maharashtra ACB.
मोबाईल ॲप : www.acbmaharashtra.net.